मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई
उपमुख्य अधिकारी/पुगा, गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.३७२, दुसरा मजला, कलानगर, वांद्रे(पु), मुंबई-५१

जाहिरात क्रमांक- १/२०१३ दिनांक :- २५/०२/२०१३

# जाहिर सूचना

मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळाच्या अखत्यारीतील उपकर प्राप्त इमारतीमधील ज्या भाडेकरु/रहिवाशी यांना निष्कासन सुचना (व्हेकेशन नोटीस) देवून इमारत खाली करण्यात आलेली आहे अशा खालील प्रकारात मोडणा-या परंतू ज्यांना यापूर्वी म्हाडातर्फे पुनर्रचित/पुनर्विकसित इमारतीमध्ये कायमस्वरुपी गाळा देण्यात आलेला नाही अशा ख-याखु-या भाडेकरु/रहिवाशी यांचेकडून दि. ०१-०३-२०१३ ते दि. ३१-०३-२०१३ पर्यत अर्ज मागविण्यात येत आहेत.

अ) सोबत " परिशिष्ट - अ" मध्ये प्रसिध्द केलेले प्रारुप बृहतसूचीतील भाडेकरु/रहिवाशी. (पूर्वी पुनर्रचित / पुनर्विकसित इमारतीत कायमस्वरुपी सदनिका मिळाली नसल्यास)

ब) संक्रमण शिबिरात राहत असलेल्या व्यक्ती ज्यांनी पूर्वी सन २०१० मध्ये राबविलेल्या मोहीमेत अर्ज भरुन दिले आहेत परंतू ज्यांच्या सुनावण्या अद्याप प्रलंबित आहेत असे अर्जदार. (पूर्वी पुनर्रचित / पुनर्विकसित इमारतीत कायमस्वरुपी सदनिका मिळाली नसल्यास)

क) ज्या भाडेकरु/रहिवाशी यांना निष्कासन सुचना (व्हेकेशन नोटीस) देवून इमारत खाली करण्यात आलेली आहे परंतू अशा भाडेकरु / रहिवाशी यांनी म्हाडाच्या संक्रमण शिबिरात गाळा घेतलेला नाही असे खरेखुरे पात्र भाडेकरु/रहिवाशी. ज्यांनी माहे नोव्हेंबर २०१२ मध्ये प्रसिध्द केलेल्या जाहीरातीस अनुसरुन अर्ज केला आहे असे अर्जदार. (पूर्वी पुनर्रचित / पुनर्विकसित इमारतीत कायमस्वरुपी सदनिका मिळाली नसल्यास)

ड) ज्या भाडेकरु/रहिवाशी यांना निष्कासन सुचना (व्हेकेशन नोटीस) देवून इमारत खाली करण्यात आलेली आहे व जे भाडेकरु / रहिवाशी सध्या म्हाडाच्या संक्रमण शिबिरात राहतात किंवा संक्रमण शिबिरात राहत नाहीत व ज्यांनी यापूर्वी बृहतसूचीमध्ये नाव समाविष्ठ करण्यासाठी अर्ज केलेला होता परंतू त्यांची नावे बृहतसूचीत आलेली नाहीत असे खरेखुरे पात्र भाडेकरु/रहिवाशी. (पूर्वी पुनर्रचित / पुनर्विकसित इमारतीत कायमस्वरुपी सदनिका मिळाली नसल्यास)

इ) सोबतच्या "परिशिष्ट- ब" मधील गाळयाच्या यादीपैकी कोणत्याही तीन गाळयांसाठी विकल्प अर्जामध्ये नमूद करावा

टीप : १) ज्यांना पूर्वी बृहतसूची समितीने अपात्र ठरविले आहे अशा व्यक्तीनी पुन्हा अर्ज करु नयेत.

२) ज्यांना पूर्वी बृहतसूची समितीने पात्र ठरवून गाळा वाटप केला आहे परंतू मंजूर केलल्या गाळयाचा ताबा घेतला नसेल अशा व्यक्तींनी पुन्हा अर्ज करु नये.

अर्जाचा नमूना, प्रारुप बृहतसूची (परिशिष्ट- अ) व उपलब्ध गाळयांची माहिती (परिशिष्ट-ब) म्हाडा संकेतस्थळ (www.mhada.com) (www.mhada.maharashtra.gov.in) येथे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

वरील म्हाडा संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या नमून्यातच अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना खाली नमूद केलेल्या कार्यालयातूनही दिनांक ०१-०३-२०१३ ते दिनांक २९-०३-२०१३ पर्यंत सकाळी ११.०० ते सांय ५.०० या वेळेत मोफत उपलब्ध होऊ शकेल.

अर्जदाराची पात्रता व पुनर्रचित / पुनर्विकसित गाळयाचे वितरण याबाबत म्हाडा कायदा १९७६ व त्या अंतर्गत विनिमय, शासनाचे वेळोवेळीचे आदेश व म्हाडाच्या प्राप्त अर्जावर अंतिम निर्णय होईपर्यतच्या धोरणानुसार निर्णय घेण्यात येईल.

मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या स्वस्वाक्षरी केलेल्या झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक आहे.

१) निष्कासन सुचना (व्हेकेशन नोटीस)
२) जुन्या इमारतीतील रहिवासाचे पुरावे उदा. शिधापत्रिका, मतदार यादीचा उतारा, विदयूत देयक, दुरध्वनी देयक, भाडेपावती, इत्यादी.
३) अर्जदाराचा पासपोर्ट साईज कलर फोटो.
४) मूळ भाडेकरु/रहिवाशी व्यतिरिक्त अन्य व्यक्ती अर्जदार असल्यास मूळ भाडेकरु/रहिवाशी यांचेकडून हक्क प्राप्त झाल्याबाबतचा कायदेशिर पुरावा.
५) अर्जदाराने स्वतः अगर टपालाद्वारे अर्ज खालील पत्यावर दि. ०१-०३-२०१३ ते दि.३१-०३-२०१३ पर्यत सादर करावा.

<u>अर्ज सादर करण्याचे ठिकाण</u> :-
उपमुख्य अधिकारी / पुगा, कक्ष क्र.३७२, दुसरा मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

सही/-
दिनांक :- २५ /०२/ २०१३
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

सहमुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई